# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | **सध्दर्म : त्रैमासिक** |
| संचालक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| प्रकाशक | : | सध्दर्म प्रकाशन |
| प्रकाशन वर्ष | : | १९७५ |
| वर्ष | : | द्हावें |
| अंक | : | चौथा |
| पृष्ठे | : | १६ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ३७**

Registrar of News-papers for India,

under R.N. 20778/71

वर्ष दहावें

अंक चवथा

आश्विन १८९७

आक्टोबर १९७५

वार्षिक देणगी

किमान

दोन रुपये

# सद्धर्म

त्रै मा सि क

संचालक

गुंडोपंत हरिभक्त

## यांतच पुरुषार्थ

"Persons are individuals who transcend their merely organic individuality in conscious (social) participation."

—Jullian Huxley—in Teillard de Chardin's "The Phenomenon of Man", introduction.

देहबुद्धि विसरून 'सर्वांभूतीं भगवंत' या जाणिवेनें समाजजीवनांत आत्मीयतेनें सहभागी होण्यांतच खरा पुरुषार्थ आहे त्यांतच मोक्ष आहे.

गिरगावांत देणगी हातीं देण्याचा पत्ता :-
श्रीधर भालचंद्र आणि कंपनी
कापडाचे व्यापारी.
४८ प्रार्थना समाज नाका
गिरगांव, मुंबई ४

## या चवथ्या अंकांत

| | | |
|---|---|---|
| १ | घटना एकच पण ... | २ |
| २ | कोण संग जोडूं ... | २ |
| ३ | विश्वशांति हवी असेल तर ... | ३ |
| ४ | परमेश्वर हाच गुरु ... | ५ |
| ५ | अविस्मरणीय ... | ११ |
| ६ | कर्मकरण्यापुरताच अधिकार! | १२ |
| ७ | असे असे विचार ... | १२ |
| ८ | बलवत्तर इच्छा ... | १३ |
| ९ | पळतां भुई थोडी ... | १४ |
| १० | हाच प्रार्थनेचा उद्देश ... | १५ |
| ११ | देण्यांतच आनंद ... | १६ |
| १२ | कृपया ... | १६ |

सद्धर्म प्रकाशन कार्यालय
९ ओवेनडन रोड मुंबई नं. ७
फोन ३५८४१३
भेटण्याची वेळ : सकाळीं ९ ते १०

# घटना एकच, पण....

" नास्त्यकार्यं कदर्याणाम्
नास्त्यक्षाम्यं महात्मनाम् ।
नास्त्युपेक्ष्यो हरेर्भक्तः
इति द्यूते प्रदर्शितम् ॥
—म. भा. द्यूत. अ. ६८, नीलकंठ

दुर्जनांना अकार्य असें कांहींच नाहीं, ते कोणतेंही दुष्ट कृत्य करतील; सज्जन क्षमा करणार नाहींत असें कांहीं नाहीं, कितीही घोर अपराध असला तरी ते तो पोटांत घालतील आणि भक्त कथाही अडचणींत असला तर भगवान त्याची उपेक्षा करणार नाहीं, भक्तांचा तो सदैव पाठीराखा आहे, हें द्यूताच्या या प्रसंगानें दाखवून दिलें आहे.

द्रौपदीवस्त्रहरणाची एकच घटना. पण महाभारतकारांनीं तिचें इतक्या खुबीनें वर्णन केलें आहे कीं तिच्यांतून टीकाकार नीलकंठांनीं वरील श्लोकांत दाखवून दिल्याप्रमाणें वेगवेगळ्या प्रकारचा बोध घेतां यावा.

यांतच महाभारतकारांचें वैशिष्ट्य आहे;

" नमोस्तुते व्यास विशालबुद्धे
फुल्लारविंदायतपत्रनेत्र ।
येन त्वया भारततैलपूर्णः
प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः ॥ "

श्री व्यास महर्षींना शतशः प्रणाम असोत.

# कोण संग जोड्टूं....

भगवत्प्रेमसागरांत सदा डुबलेली (God-intoxicated) मीराबाई एक थोर भक्त म्हणून प्रसिद्धच आहे. पण तिच्या गीतांतून भक्तिरसाबरोबरच अत्यंत उच्च प्रकारच्या कविकल्पनांच्या भराऱ्याही विपुलपणें पाहावयास सांपडतात हें आपणास ठाऊक आहे का ? नसेल तर तिचें पुढील गीत पाहा :

" जो तुम तोडो पिया मैं नहीं तोडूं ।
तोरी प्रीत तोडी कृष्ण कोण संग
जोडूं ॥ ध्रु ॥
तुम भये तरुवर मैं भई पखिया ।
तुम भये शरोवर मैं तेरी मछिया ॥ जो
तुम ॥ ध्रु ॥ १ ॥
तुम भये गिरिवर मैं भई चारा ।
तुम भये चंदा हम भये चकोर ॥ जो तुम ॥
ध्रु ॥ २ ॥
तुम भये मोती प्रभु हम भये धागा ।
तुम भये सोना हम भये स्वागा* ॥ जो तुम
॥ ध्रु ३ ॥
बाई मीरा कहे प्रभु व्रजके वाशी ।
तुम मेरे ठाकोर मैं तेरी दासी ॥ जो तुम ॥
ध्रु ॥ ४ ॥

हें गीत वाचीत असतां विशेषतः नामदेव जनाबाईंच्या अभंगांतील कविकल्पनांच्या भराऱ्यांची आठवण येते; खरें ना ?

* स्वागा म्हणजे टाकणखार.


देणगी मनिऑर्डरनें धाडण्याचा पत्ता
**श्री. भालचंद्र उपासनी**
३३८ सॅम्युअल स्ट्रीट
पो. बॉ. नं. ३२६८ मुंबई ३

दादरला देणगी हातीं देण्याचा पत्ताः-
**श्री गंगाधर प्रिंटिंग प्रेस**
वेस्टर्न रेल्वे फूटब्रिजच्या समोर
दादर, मुंबई २८

# विश्वशांती हवी असेल तर....

शस्त्रैर्हतास्तु रिपवो न हता भवन्ति
प्रज्ञाहताश्च नितरां सुहता भवन्ति ।
शस्त्रं निहन्ति पुरुषस्य शरीरमेकं
प्रज्ञा कुलं च विभवं च यशश्च हन्ति ॥

— नि. सा. सुभाषित; २७६–९५२

"भारतीय लोक सत्यनिष्ठ, न्यायी, उदार, व्यवहारांत सरळ, शांतताप्रिय, आदरातिथ्यांत दक्ष आणि वृद्ध अपंगांची नेहमीं काळजी घेणारे असे आहेत."[१]

मौर्यांच्या दरबारी अनेक वर्षें राहिलेल्या मेगॅस्थेनिस ह्या ग्रीकांच्या वकिलानें इ. स. पूर्व तिसऱ्या शतकाच्या अखेरीस लिहून ठेवलेलें हें तत्कालिन भारतीयांचें वर्णन आहे.

हें वर्णन अर्थातच प्राचीन काळचें आहे, असें म्हणतां येईल. पण त्यानंतर बऱ्याच वर्षांनीं म्हणजे इ. सनाच्या बाराव्या शतकांत अल इद्रिसी नांवाचा मोरोक्कोचा एक प्रवासी भारतांत आला होता, त्यानें लिहून ठेवलेलें भारतीयांचें वर्णनही अशाच प्रकारचें आहे. तो म्हणतो,

"भारतांतील लोक स्वभावतःच न्यायानुवर्ती आहेत. ते कधींही न्यायाला सोडून वागत नाहींत. त्यांची व्यवहारांतील सचोटी, प्रामाणिकपणा आणि विश्वासूपणा प्रसिद्ध आहेत. त्यांची या गुणांबद्दल ख्याती असल्यानें चारीही दिशांनीं लोक त्यांच्या देशांत गोळा होत असतात. आणि त्यामुळें त्यांच्या देशाची भरभराट झालेली असून लोक समृद्ध आहेत."[२]

इंग्रज लोक भारतांत पाय पसरूं लागले त्यावेळींही भारतीयांची स्थिती अशीच प्रशंसनीय होती. १८२५च्या सुमारास ईस्टइंडिया कंपनीच्या पदरीं मुंबई प्रांतांत सतत २४ वर्षें काम करीत असलेल्या लेफ्टनंट कर्नल मोनियेर विलियम्स या इंग्रज अधिकाऱ्यानें भारतीयांबद्दल पुढील प्रमाणें आपल्या आठवणींत नमूद करून ठेविलें आहे. तो म्हणतो,

"मला आणि माझ्या हाताखालच्या माणसांना खेड्यापाड्यांतील सर्व जातींच्या लोकांच्या संबंधीं साध्या आणि नेमस्त असल्याचें दिसून आलें. स्वभावानें गरीब आणि शांतताप्रिय असून, ते आपआपलीं कामें बजावण्यांत चोख, आज्ञाधारक आणि विश्वासू आहेत. ह्या खेडुतांची त्यांच्याच दर्जाच्या युरोपियन लोकांशीं तुलना केल्यास, सुशीलपणा आणि एकंदर चालचलणूक ह्यांबाबत ते युरोपियनांच्या तोडीचे ठरतील. विशेष असे कोणतेही दुर्गुण त्यांच्या ठायीं नाहींत. मुलें आई-बापांच्या प्रेमाची फेड आपल्या अंगच्या कर्तव्यपरायणतेनें करतात. पाहुण्यांचें आदरातिथ्य काळजीपूर्वक केलें जातें. गाजावाजा न करतां दानधर्म देशभर केला जातो. संन्याशी व वैरागी ह्यांव्यतिरिक्त कोणी धंदेवाईक भिकारी आढळत नाहींत. दीनदुबळ्यांच्या साहाय्याबाबत कोणत्याही प्रकारें कायद्याचें बंधन नसतांही त्यांच्या चरितार्थाची सोय खेड्यांतूनच लोकांकडून केली जाते. लोकांचा एकमेकांवर इतका विश्वास आहे कीं पैशाअडकऱ्यांच्या देण्याघेण्यांबाबत लेखी व्यवहाराची त्यांना जरुरी भासत नाहीं.

---

१. McCrindle, Ancient India as described by Megasthenes and Arrian,
Elliot, History of India, Vol. I, p. 88.

शेतकरी सारा देतात पण तो दिल्याची पोंच पावती मागत नाहींत. ठेव ठेवल्यास त्यासाठीं साक्षीपुराव्यांची गरज नसते. एकदां पर्वकाळीं नर्मदेकांठीं दोन लाख माणसें जमा झालीं असतां तेथें कोणत्याही प्रकारची धिंगामस्ती, भांडणकांडण, नशाबाजी अथवा अन्य प्रकारची गडबड झाली नाहीं. सर्वजण आपआपलीं धार्मिक कृत्यें करण्यांत दंग होते. सर्व्हे करण्यासाठीं जाणाऱ्या अधिकाऱ्यांच्या संरक्षणासाठीं खेड्यांपाड्यांतील चौकीदाराखेरीज अन्य कोणीही माणूस नसतो. तरीपण कुठेंही दरवडा पडत नाहीं, किंवा तंबूतील सुतळीच्या तोड्यालाही कुणी स्पर्श करीत नाहीं."

कर्नल साहेबांनीं या आठवणी प्रसिद्ध केल्या[३] त्यानंतर १८७५ सालीं त्यांचे चिरंजीव विख्यात संस्कृत कोशकार सर मोनियेर विलियम्स भारतांत आले होते. सर्व देशभर प्रवास केल्यानंतर "Modern India and Indians" हा अत्यंत विचार प्रवर्तक असा आपला ग्रंथ त्यांनी प्रसिद्ध केला. त्यांत आपल्या वडिलांच्या वर दिलेल्या आठवणींचा सविस्तर उल्लेख करून ते म्हणतात,[४]

"या लोकांचा स्वभाव व एकंदर चालचलणूक यांबाबत पन्नास वर्षांपूर्वी माझ्या वडिलांनीं हें जें अत्यंत स्पृहणीय असें वर्णन केलें आहे, त्यांत आज मितीला फारसा फरक झाला आहे, असें म्हणतां येणार नाहीं अजूनही तीच परिस्थिती कायम आहे."

३. Lieut. Colonel Monier Williams, Memoir of the Zilla of Broach, p. 108.

४. Sir Monier Williams, Modern India and the Indians, p. 51.

सर मोनियेर विलियम्स यांच्या वर उल्लेखिलेल्या ग्रंथावरून ते अत्यंत निर्भीड, मार्मिक आणि चोखंदळ वृत्तीचे टीकाकार होते, असें कुणालाही दिसून येईल. अशा प्रकारच्या एका परकीयाला १८७५ सालींही भारतीय लोक चारित्र्यसंपन्न असे आढळून आले, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. असें असत आतां १९७५ सालीं म्हणजे केवळ शंभर वर्षांनी तेच भारतीय लोक आज पूर्णतया चारित्र्यभ्रष्ट बनलेले असावेत, हा एक दैव दुर्विलासच नव्हे का! तो तसा असो अगर नसो, त्याचें कारण शोधून काढण्यासाठीं फार दूर जाण्याची आवश्यकता नाहीं. सर मोनियेर विलियम्स साहेबांच्या उपरिनिर्दिष्ट ग्रंथांतच तें आढळून येतें.

साहेबमजकुर भारतांत आले त्या आधीं १५-२० वर्षांपासून मेकॉलेसाहेबांच्या धोरणानुसार[५] भारतीयांना 'इंग्रजी' पद्धतीनें शिक्षण देण्यासाठीं शाळा-कॉलेजें काढण्यांत आलीं होतीं आणि त्यांत शिक्षण घेऊन भारतीय तरुण भराभर बाहेर पडूं लागले होते. सरसाहेबांनीं आपल्या दौऱ्यांत ठिकठिकाणच्या अशा शाळा-कॉलेजांना भेटी दिल्या आणि त्यांतून बाहेर पडलेल्या अनेक तरुणांच्याही जागोजागीं गांठी घेतल्या. त्यांत झालेलीं

५. "It is my firm belief that if my plans of education are followed up, there will not be a single idolator among the respected classes of Bengal, thirty years after, and this will be effected without any efforts to proselytise." —Macaulay's letter to his father, dated 12 Oct. 1826.

साहेब मजकुरांची वाणी अखेर खरी ठरली असेंच म्हणावें लागतें.

आपलीं मतें सरसाहेबांनीं आपल्या ग्रंथांत अत्यंत प्रांजळपणें व्यक्त केलीं आहेत. ते म्हणतात[६],

"आपण करीत असलेल्या उच्च-शिक्षणाबाबतच्या प्रयत्नांसंबंधीं माझें मत नेहमीं अनुकूल झालें नाहीं. तें शिक्षण घेतलेलीं जीं माणसें मला भेटलीं, त्यांतील अगदींच थोडीं चांगल्या प्रकारें शिक्षण घेतलेलीं आढळलीं, बाकी, कांहीं अर्धवट शिकलेलीं पण बहुसंख्य तर भलभलतेंच शिकलेलीं आणि मनानें विकृत बनलेलीं अशींच होतीं त्यांच्यांत चारित्र्याचा पूर्ण अभाव होता व त्यांच्या मनाचा तोल नाहींसा झालेला दिसला. या लोकांचें वाचन पुष्कळ झालेलें होतें, पण ते विचारशून्य होते. कोणी विचार केलाच तर त्या विचारांना स्थैर्य नव्हतें. पुष्कळसे तर निव्वळ बडबडे होते—जणूं त्यांना वाचिक अतिसाराचा (diarrhoea) विकार जडला होता. बोलणें सर्वसाधारणपणें लाघवी, पण लिखाण अवास्तव होतें. नेटानें काम करण्याची त्यांना संवय नव्हती; आणि इतकेंही करून त्यांनीं कांहीं काम हातीं घेतलेंच तर त्याच्यापाठीमागें निश्चित अशी तत्त्वनिष्ठा नव्हती आणि लिहिण्याबोलण्यांत जबाबदारपणा नव्हता. कोणताही एक धर्म असो—मग तो खरा असो कीं चुकीचा असो—त्यामागें एक प्रकारची प्रेरणाशक्ति, संयमामुळें येणारें सामर्थ्य अथवा अढेपायीं लाभणाऱ्या समाधानाचा आल्हाद असतो, या गोष्टीची त्यांना मुळींही जाणीव नव्हती. हे लोक स्वभाषांकडे दुर्लक्ष करतात; त्यांतील वाङ्मयाचा त्यांना आदर नसतो. ते आपला धर्म सोडून देतात. त्यांतील तत्त्वज्ञानाचा त्यांना तिटकारा वाटतो. हे लोक आपल्या जातींचीं बंधनें मोडतात आणि पूर्वापार चालत आलेल्या चालीरीतींचा उपहास करतात. आणि इतकेंही होऊन ते उत्तम इंग्रजी पंडित, प्रामाणिक नास्तिकवादी, शहाणे विचारवंत, खरेखुरे खिश्चन वा ब्रिटिश साम्राज्याचे निष्ठावंत प्रजाजन बनले असते, तर त्याला कांहीं अर्थ तरी होता; पण तेंही झालेलें नव्हतें."

सर मोनियेर विलियम्स साहेबांनीं इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतीय तरुणांचें जें हें वर्णन केलें आहे त्या काळच्याच लेख्या-पाख्यांतील आम जनतेच्या चारित्र्यासंबंधीं त्यांनीं काढलेले प्रशंसोद्गार आपण वर वाचले आहेत. त्यावरून सुरवातीपासूनच इंग्रजी शिक्षणाचे परिणाम आपल्या तरुण पिढीवर काय होत गेले याची कल्पना येते.

मेगॅस्थेनिस पासून तो तहद सरसाहेबां-पर्यंतच्या दोन हजार वर्षांच्या दीर्घ काळांत भारतीय लोकांचें चारित्र्य सातत्यानें टिकून राहिलेलें होतें, हें वर उद्धृत केलेल्या वेगवेगळ्या काळांतील अवतरणांवरून आपण पाहिलेंच आहे. या काळांत भारतावर अनेक परकीयांनीं वेळोवेळीं आक्रमणें केलीं, कांहींनीं आपलीं राज्येंही येथें स्थापिलीं; तरीही आम भारतीय जनतेचें चारित्र्य अव्याहतपणें टिकून राहिलें. त्याचें कारण त्या परकीयांपैकीं कोणीही भारतीयांच्या प्रज्ञेवर प्रहार केले नव्हते हें होय. ब्रिटिशांनीं मात्र येथें येतांच नेमकें तें केलें. त्यांनीं इंग्रजी शाळा-कॉलेजें स्थापना करून त्यांतील शिक्षणद्वारा भारतीय तरुणांच्या मनांत आपले पूर्वज, आपली संस्कृती, आपला

६. Sir Monier Williams, l.c. pp. 303-304.

धर्म, आपले देव, तत्वज्ञान व वाङ्मय आणि आपल्या चालीरीती या सर्वांबद्दल अनादर आणि घृणा निर्माण करून* त्यांच्या प्रज्ञेवर आघात केले. आणि शिरोभागीं दिलेल्या सुभाषितांत म्हटल्याप्रमाणें माणसाच्या प्रज्ञेवर आघात झाले म्हणजे त्यांचें कुल, वैभव आणि यश हीं सारींच नाहींशी होत असतात. सर मोनियेर विलियम्स साहेबां-नंतरच्या केवळ शंभर वर्षांत आज आम्ही जे अत्यंत चारित्र्यभ्रष्ट झालेले आहोंत त्याचें कारण ब्रिटिशांनीं शिक्षणद्वारा केलेले आमच्या प्रज्ञेवरील आघात हेंच होय. एरवीं अनेक गंडांतरें येऊनही आमचें चारित्र्य दोन हजार वर्षे कायम असावें आणि नंतर केवळ शंभर वर्षांच्या अवधींत तें आज धुळीला मिळालेलें दिसावें, ह्याची उपपत्ति लागत नाहीं. गेल्या शंभर वर्षांचा आपला इतिहास म्हणजे प्रज्ञाहत झालेल्या लोकांचा इतिहास होय.

७. "The Indian religions system is mean, litentions and cruel. . . . It is one grand abomination."—Parliamentary History, XXVI, 861. "Men (Hindus) whose ideas of the divine nature are mean, ridiculous, gross and disgusting."—Mill, History of India, Vol. I, 1826 edn., p. 287.
"The Brahmins are the most audacious and perhaps the most unskilful fabricators, with whom the annals of fable have yet made us acquainted."—Mill, l.c. p. 144.
या अवतरणांवरून आमच्या तरुणांच्या मनांत कशा प्रकारचे विचार पेरले जात होते, याची कल्पना येईल. मिलसाहेबांचा इतिहास त्या वेळीं सर्व शिक्षणक्रमांत शिकविला जाई.

या काळांत आपण आपली प्रज्ञा ब्रिटि-शांच्या हवाली करून जीवनाच्या विविध क्षेत्रांतून त्यांच्या आणि त्यांच्या अनुषंगानें इतर पाश्चात्यांच्या विचारांचा सर्वतोपरी अवलंब करीत आलों आहोंत. त्यामुळें पाश्चात्य देशांतील लोकांची जी आज अवस्था झाली आहे, तशीच अवस्था आपलीही झालेली आहे. आणि त्यामुळें त्यांच्याप्रमाणेंच आपणही आज अशांतीच्या खाईत पडलों आहोंत.

गेल्या शंभर वर्षांत युरोपांत विज्ञानाची जी अभूतपूर्व अशी वाढ झपाट्यानें झाली तेंच या अशांतीचें मूळ कारण आहे. त्यापूर्वीच्या काळांत तेथील लोकांची वावर-

८. ...मात्र विज्ञानामुळें जीवनपद्धतींत सर्वत्र जो अभूतपूर्व फरक झाला त्यामुळें माणसामाणसांचें परस्परा-वलंबित्व वाढत गेलें आणि समाज पूर्णतया एकजीव (organic) बन-ल्यानें सहकार्याशिवाय जगांत कुणाचेंच आतां क्षणभरही चालणार नाहीं, अशी आजची जी वास्तविक परिस्थिति निर्माण झालेली आहे, तिच्याकडे दुर्दैवानें आपल्या विचारवंतांनीं लक्ष दिलें नाहीं. तसें तें दिलें असतें, तर विश्वांत खरोखरी अंततः एकात्मता आहे, ह्याची त्यांना प्रचीति आली असती व घ्या अनुरोधानें त्यांनीं जनमनाला वळण लावलें असतें आणि मग आजचें शीतयुद्ध उपस्थित होण्याचें कारणच उरलें नसतें. सद्धर्म, जुलै १९७५, मुख करांत आहे, हा लेख पाहावा.

त्यावर पूर्ण श्रद्धा होती. पण विज्ञानानें लागलेल्या शोधांपायीं त्यांतील अनेक वचनें खोटीं ठरून ख्रिस्तिधर्म उघडा पडला आणि लोक स्वतंत्रपणें विचार करूं लागून वास्तववाद (realism), उपयुक्ततावाद (utilitarism) मानवकल्याणवाद (pragmatism) अशा प्रकारचीं अनेक नवीं नवीं स्वतंत्र मतें प्रस्थापित होत जाऊन त्यांचें पर्यवसान अखेर जडवादांत (materialism) झालें आणि जुनी जीवन मूल्यें कोलमडून लोकांच्या केवळ देहबुद्धीला (organic sense) प्रोत्साहन मिळाल्याने भोगवृत्ति (organic satisfaction) बळावली.

याच काळांत नव्या नव्या यंत्रांचे शोध लागून ठिकठिकाणीं कारखाने निघाले आणि मालाची पैदास भराभर सुरू होऊन आयात व निर्यातीचा व्यापार वाढला, त्या व्यापाराच्या सोईसाठी साता समुद्रांपलीकडे वसाहती स्थापन झाल्या व त्या वसाहतींच्या सुरक्षिततेसाठीं वेगवेगळ्या देशांनीं अखेर तेथें आपआपली राज्यें स्थापन केलीं आणि त्यांतूनच साम्राज्यशाहीचा उदय झाला. स्पर्धा अथवा चुरस (competetion) हाच या व्यापाराचा आत्मा. त्या पायीं वसाहतवाल्या राष्ट्रांराष्ट्रांत लवकरच वैमनस्य वाढत जाऊन त्याचें पर्यवसान अखेर पहिल्या जागतिक महायुद्धांत झालें व त्या युद्धानें शांतता निर्माण न झाल्यानें पुन्हा दुसरें महा युद्ध झालें व आज शीतयुद्ध सुरू आहे. या शीतयुद्धानें केवळ पाश्चात्त्यांनाच नव्हे तर साऱ्या जगालाच अशांतीच्या खाईंत लोटलें आहे.

जगांत शांतता कशी प्रस्थापित करावयाची ही मानवजातीपुढील प्रधान समस्या आहे.

विज्ञानाच्या वाढीमुळें या काळांत पाश्चात्त्य लोक स्वतंत्रपणें विचार करण्यास धजूं लागल्याचा उल्लेख वर आलाच आहे. त्यामुळें त्यांच्या राजकीय हक्कांविषयींच्या विचारांनाही प्रोत्साहन मिळून पश्चिमेंत लोकशाही बळावली हें खरें, पण त्याबरोबरच लोकांत जडवादाचें (materilism) प्राबल्य होऊन त्यांची भोगवृत्ति वाढल्यानें ते आतां अर्थदास बनले होते आणि म्हणून खरें राजकीय स्वातंत्र्य बाजूला राहून मतांचा क्रयविक्रय सुरू झाला आणि त्यामुळें राजकीय सत्ता परदेशी व्यापारानें नुकत्याच गबर झालेल्या कारखानदारांच्या हातीं गेली व स्पर्धा (competition) हें जें त्या व्यापारांतील त्यांचें आद्य जीवनमूल्य त्याचा शिरकाव मग राजकारणांतही सर्रास झाला, त्यांत नवल नाहीं. त्यामुळे पुढें पक्षांपक्षांतील स्पर्धा, त्यापायीं गटबाजी आणि भल्याबुऱ्या हव्या त्या मार्गानें जो अधिक मतें गोळा करील त्याचे हातीं राज्यसत्ता, असें स्वरूप लोकशाहीला सर्वत्र प्राप्त झालें.

औद्योगिक क्रांतीनंतर (industrial revolution) सर्व पाश्चात्त्य देशांत भराभर कारखाने निघत गेल्यानें मजुरांची संख्या अमाप वाढली आणि त्यांचे व कारखानेवाल्यांचे वारंवार संघर्ष होऊं लागले. त्यामुळें साहजिकच सर्व देशांतून कारखानदार अतएव मालक आणि मजूर असे दोन परस्पर विरोधी असलेले वर्ग बनले आणि राजकीय सत्ता मालकांच्या हातीं असल्यानें वर्ग–विग्रह वाढत जाऊन त्याचें पर्यवसान बहुधा मजुरांनीं संघसत्तावादाच्या (communism) झेंड्या-

खालीं गोळा होऊन मालकवर्गाच्या हातांतील राजकीय सत्ता येनकेन प्रकारेण हिसकावून घेण्याच्या मार्गाला लागण्यांत झाला, आणि आपल्या पक्षाला मजबुती यावी म्हणून त्यांनीं संघसत्तावादाचें जाळें प्रचाराद्वारा (Propoganda) सर्व जगभर पसरलें. त्यामुळें स्पर्धेच्या बळानें चालणारी लोकशाही आणि वर्गविग्रहावर आधारलेला संघसत्तावाद अशा दोन परस्परविरोधी मतांचें प्राबल्य जगभर होत गेलें.

अशी परिस्थती असतांना पहिल्या महायुद्धानें न सुटलेले प्रश्न धसास लावून जगांत शांतता प्रस्थापित करण्यासाठीं दुसरें महायुद्ध झालें. पण त्यानें शांतता तर प्रस्थापित झाली नाहींच; उलट अधिकाधिक बुद्धीनें लावलेल्या विज्ञानाच्या शोधापायीं महासंहारक अशीं अण्वस्त्रं मानवाच्या हातीं आलीं. आणि ज्या सत्तेजवळ हीं अस्त्रें अधिक त्याचीच इतःपर जगांत सरशी होईल अशा विश्वासानें आज संघसत्तावादी तद्वत लोकशाहीचे पुरस्कर्ते, असे दोन्ही पक्षांचे लोक, मॉस्को आणि न्यूयॉर्क यांच्या नेतृत्वाखालीं, एकीकडे तशीं तीं अस्त्रें अधिकाधिक बनविण्यांत गुप्तपणें गुंतले आहेत, तर दुसरीकडे आपल्या पक्षाचें बळ वाढविण्यासाठीं जगांतील अधिकाधिक देश आपल्या झेंड्याखालीं यावेत म्हणून उघडपणें प्रचार करीत आहेत.

अशा परिस्थितींत, कोणत्याही पक्षीं मनाचा तोल नाहींसा झाल्यास, स्फोट होऊन अवघ्या मानवजातीचा संहार होईल, अशा प्रकारची एक सुप्त भीति सर्व जगभर पसरल्यानें वातावरण सर्वत्र तंग आहे. हें आज आपण पाहातच आहोंत हें "शीतयुद्ध" पूर्वीच्या दोन्ही महायुद्धांपेक्षांही अधिक हानिकारक आहे.

पण त्यांत विनोद हा आहे कीं, आपल्या पक्षाची सरशी झाल्यास जागतिक सत्तेच्या जोरावर आपण जगांत शांती प्रस्थापित करूं अशी दोन्हीही पक्षांची प्रामाणिक भावना आहे! लोकशाही तद्वत संघसत्तावादी या दोन्ही पक्षांची निर्मिती व वाढ यांचें विवेचन थोडक्यांत वर आलेंच आहे. त्यावरून स्पर्धा हा लोकशाहीचा आत्मा आहे, आणि विग्रह—वर्गविग्रह—हीच संघसत्तावादाची प्रेरणा आहे, हें आपल्या लक्षांत आलें असेलच. स्पर्धा काय किंवा विग्रह काय, हे दोन्ही मनोविकार अशांतिजनक आहेत. त्यांतून काम, क्रोध, मद, मोह मत्सरादि अन्य तत्सम मनोविकार निर्माण होऊन मनाची शांती ढळते. तेव्हां स्पर्धा आणि विग्रह, हेंच ज्यांचें सर्वतोपरी मांडवल आणि ज्यांचीं मनें कामक्रोधादिकांनीं व तज्जन्य दुष्ट विकारांनीं पूर्णपणें व्यापलेलीं आहेत अशा लोकांकरवीं मग ते लोकशाहीवादी असोत किंवा संघसत्तावादी असोत, जागतिक शांतता कशी निर्माण होणार? हा केवळ आभास नव्हे का? कुचल्याच्या वृक्षाला कधीं गोड फळें लागतील का? भांगेच्या बीजांतून कधीं तुळशीचीं रोपें निर्माण झालीं आहेत का? "जसें बीज तसा अंकुर" हाच निसर्गाचा न्याय आहे, हें विसरतां कामा नये.

पण दुर्दैवानें प्रज्ञाहत झालेल्या आम्हा भारतीयांना आज त्याचा विसर पडला आहे. वर म्हटल्याप्रमाणें, गेलीं शंभर वर्षें आपण पाश्चात्त्यांचे विचार सर्वतोपरी डोळे मिटून ग्रहण करीत आलों आहोंत. त्यामुळें

साहजिकच आपणही त्या दोन वादांच्या जाळ्यांत सांपडलों आहोंत आणि परिणामीं एकमेकांचीं डोकीं फोडीत आहोंत. स्पर्धा आणि विग्रह, अशासारख्या दुष्ट विकारांवर आधारलेल्या वादांची कास धरल्यावर दुसरें काय साधणार ? डोकींच फुटणार.

तीं फुटावयास नको असतील, खरी विश्व-शांती हवी असेल, तर त्यासाठीं अन्य मार्गानें जावयास हवें. वैदिक काळापासून तों तहद एकनाथ—तुकारामांच्या काळापर्यंत, आपले सारे ऋषिमुनी आणि साधुसंत तो मार्ग कोणता, तें टाहो फोडून सांगत आले आहेत. 'भूतीं भगवंत' या निष्ठेनें, मानवाच्या ठायीं निसर्गतःच वसत असणाऱ्या, पण देहबुद्धीपायीं दबून राहणाऱ्या प्रेम, दया, अनुकंपा, आदर, मित्रभाव आदि कोमल भावनांचा परिपोष करून, समाजांत सर्वांशी खऱ्या आत्मीयतेचे संबंध ठेवणें व त्यासाठी संयमपूर्वक स्वतःच्या स्वार्थाला मुरड घालण्याच्या अटोकाट प्रयत्नांत असणें, हाच शांतीचा—विश्व-शांतीचा तो मार्ग होय.

देहबुद्धि आणि तज्जन्य भोगवृत्ति हींच ज्यांच्या जीवनांतील आद्य मूल्यें आहेत, 'भूतीं भगवंत' ही निष्ठा ज्यांच्या गांवीही नाहीं, अशा पाश्चात्त्यांना त्या मार्गाचें आकलन होणें दुष्कर आहे. पण त्यागाचें तत्त्व ज्यांच्या रक्तांत आज हजारों वर्षे भिनलेलें आहे—यज्ञ अतएव त्याग, हाच ज्यांचा धर्माचा खरा पाया आहे अशा आपणा भारतीयांस, सध्यां डोळ्यांपुढें आलेलें अज्ञानतिमिर दूर सारल्यास, त्या मार्गाचा पुनश्च अवलंब करणें अशक्य नाहीं.

देव करो आणि तशी बुद्धि आपणास लवकरच होवो.

॥ ॐ तथास्तु ॥

## परमेश्वर हाच गुरु !

"Pain is the hand of nature sculptoring men to perfection."
—*Aurobindo, Savitri*

गंगाकाठीं एक वृद्ध संन्यासिनी राहतात. साठी सहज उलटलेली असेल, थोड्याशा वाकल्या आहेत. पण अजून रोज काठी टेकीत टेकीत पांचसहा मैलांचा फेरफटका सहज करीत असतात. चेहऱ्यावर नेहमीं हास्य आणि मुखीं रामनाम असतें. वाटेंत कुणीही भेटलें तर मोठ्या आपलेपणानें त्या त्याची विचारपुस करतात. कुणाचे कांहीं लहान सहान काम असल्यास तेंही करायला त्या उत्सुक असतात. त्यांच्याकडे बघितलें म्हणजे समाधान लाभतें—मग थोडेंसें बोललें तरीही आल्हाद वाटावा, यांत नवल नाहीं.

पहाटे उठून गंगास्नान व जपजाप्य करावें, नंतर देवदर्शनाच्या निमित्तानें फेर-फटका करावा, दोनप्रहर झाली कीं आपल्या कुटींत बेऊन, हातांच दोन तीन रोट्या भाजाव्या व थोडीशी डाळ वा भाजी बनवून, अल्प भोजन करावें आणि मग विश्रांति घेऊन सायंकाळीं पुन्हा देवदर्शन करीत हिंडावें, असा त्यांचा रोजचा कार्यक्रम असतो. काळोख झाला कीं कुटींत येऊन अंधारांतच माळा ओढीत त्या झोपीं जातात. त्यांना दिवाबत्तीची जरुरी भासत नाहीं. त्या एकभुक्त आहेत, हें सांगावयास नकोच

## पण तें उमजायला हवें…

त्यांच्या वडिलांनीं एक अनाथ मुलगा पाळला होता. त्याला त्या आपला भाऊ मानतात. तो महिन्याकांठीं त्यांना तीस रुपयांची मनिऑर्डर धाडतो. त्यावर त्यांचा गुजारा चालतो. भावानें 'अधिक पैसे धाडूं का ?' म्हणून विचारलें तर त्या त्याला मना करतात आणि इतकेंही करून जर, सणवार समजून, त्यानें अधिक धाडलेच, तर ते त्या गोरगरिबांना वाटून टाकतात. त्यांतच त्यांना आनंद वाटतो. संयम आणि त्यापासून लाभणारें समाधान म्हणजे काय असतें, याची त्यांच्याकडे पाहिलें म्हणजे प्रचीति येते. याला म्हणतात खरी विरक्ति.

एकदां आमच्या एका परिचितानें त्यांना म्हटलें, "माताजी, बरेच दिवसापासून आपल्याला कांहीं विचारावेंसें वाटतें विचारूं का?"

बाई नेहमीप्रमाणें हास्य करून म्हणाल्या, "बेटा, अवश्य विचार."

परिचित म्हणाला, "माताजी, आपणाला संन्यास कुणी दिला; आपला गुरु कोण ?"

मुलांना गोष्ट सांगावी, तशा प्रकारें बाई अगदीं सहज लीलेनें म्हणाल्या,

"बेटा, मी चार वर्षांची पोर असताना माझी आई वारली, दहा वर्षांची झालें आणि वडिलांनीं माझें लग्न करून दिलें, तीन चार वर्षांतच माझे पति गेले. नंतर वडिलांनीं माझ्या शिक्षणाची सोय केली आणि पांच सहा वर्षांतच तेही वारले. मग कांहीं वर्षें मी मास्तरणीची नोकरी केली आणि जो थोडा फार पैसा गांठी झाला होता तो घेऊन येथें गंगाकांठीं आलें आणि एका आश्रमांत राहूं लागलें, तर तेथील महंतानें माझा तो पैसाही लुबाडून मला घालवून लावलें. बेटा, सांग आतां संन्यास घ्यायला मजजवळ शिल्लक काय राहिलें ? परमेश्वरानेंच नाहीं का मला संन्यास दिला ? तोच माझा गुरु. दुसरा कोणी गुरु मला कशाला हवा ?"

आणि असें म्हणून बाई नेहमीप्रमाणें हास्य करीत शांत वृत्तीनें राम राम म्हणत आपल्या फेरफटक्याला लागल्या !

या बाईची जीवनकथा ऐकली म्हणजे शिरोभागीं दिलेल्या अरविंदांच्या वचनाची आठवण येते. आपल्यावर जी संकटें येत असतात त्यांच्या द्वारा परमेश्वर आपणाला पूर्णत्वाला नेत असतो, हेंच खरें. पण अडचण हीच कीं तें समजायला आणि उमजायला हवें.

## स्वदेशो भुवनत्रयम्….

माताच पार्वतीदेवी
पितादेवो महेश्वरः ।
बांधवाः शिवभक्ताश्च
स्वदेशो भुवनत्रयम् ॥

अन्नपूर्णास्तोत्र, शंकराचार्य

सर्वांचं मंगल व्हावं म्हणून सदाशिवाला सर्वार्थानं शरण जाऊन त्याच्याशीं एकरूप होणारी देवी पार्वती हीच माता, परममंगल भगवान सदाशिव हाच पिता, शिवाचे-मांगल्याचे उपासक हेच बंधु-बांधव आणि त्रैलोक्य हाच माझा स्वदेश होय.

आज प्रांतवाद-राष्ट्रवाद यांसारख्या, मानवताविरोधी संकुचित स्वार्थी भावनांचा उद्रेक झाल्यानं सर्वत्र अमांगल्य पसरून भ्रष्टाचार शेकाळला आहे. सारें विश्व अशांतीनें होरपळत असून तें सर्वसंहारक विनाशाकडे वेगानें जात आहे.

अशा वेळीं विनाशांतून वाचायचें असेल तर भगवान शंकराचार्यांच्या सांगण्याप्रमाणें सर्वांनीं मांगल्याचे भक्त बनून सारें विश्व हा आपला देश आहे, आपण सारे एक आहोंत ही जाणीव आत्मसात केली पाहिजे.

# अविस्मरणीय....

हरद्वारच्या एका धर्मशाळेची व्यवस्था पाहणारे एक स्वामी आहेत. खरोखरीच साधुवृत्तीचे ते एक संन्यासी आहेत. त्यांच्याकडे नुसतें पाहिलें तरी समाधान लाभतें. वाणी गोड आहे. गेली वीस वर्षें ते तेथील काम सतत पाहत आहेत. जागेसाठीं कुणी यात्रेकरू त्यांच्याकडे आले आणि माणसें बरीं आहेत असें त्यांना वाटलें तरच ते त्यांना जागा देतात आणि नोकरांकरवीं त्यांची सर्व सोय मुकाट्यानें लावतात. पण एकदां तशी सोय लावली म्हणजे मग मात्र ते त्या यात्रेकरूंच्या खोलीकडे फिरकायचे नाहीत की त्यांच्याशीं बोलायचे नाहीत. सर्व काम मुकाट्यानें चालायचें. कुठेंही हलागुल्ला नाहीं. सर्वत्र शांत असतें. त्या धर्मशाळेचा वास्तुपुरुष खरोखरी पुण्यात्मा असला पाहिजे.

धर्मशाळा अगदीं नदीकाठीं असून जागा भरपूर, स्वच्छ आणि सर्व सोयींनीं युक्त आहे. बाजारही जवळच. त्यामुळें यात्रेकरू साहजिकच तेथें उतरायला उत्सुक असतात.

एकदां एक बड्या जमीनदारीणबाई धर्मशाळेच्या ट्रस्टींच्या मध्यस्थीनें तेथें उतरायला आल्या होत्या. स्वामींनीं आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें मुकाट्यानें त्यांची सर्व सोय त्यांना हवी होती तशी लावून दिली व आपल्या मार्गी गेले. थोड्याच वेळानें जमीनदारिणीचा एक सेवक स्वामींकडे येऊन त्यांना म्हणाला, "स्वामी, आपल्याला आमच्या बाईसाहेबांनीं बोलावलें आहे. "लवकर चला, काम आहे."

स्वामींनीं शांतपणें उत्तरं दिलें, "हें पाहा, त्यांना हवी होती तशी सारी सोय मी लावून दिली आहे. याहून अधिक कांहीं माझ्या हातून व्हायचें नाहीं. तुम्ही यात्रेकरू जे अशा क्षेत्रांच्या ठिकाणीं येता, त्यांनीं संन्याशांची सेवा करायची असते संन्याशांकडून सेवा घ्यायची नसते."

उत्तर ऐकून बाईसाहेब चरफडल्या. पण करतात काय ? स्वामींनीं आपल्यापरी त्यांची अवश्य ती सारी सोय लावून दिलेलीच होती.

एकदां धर्मशाळेचे एक नवे ट्रस्टी त्यांना म्हणाले, "स्वामी, सध्यां आपल्या येथें जे एक यात्रेकरू उतरले आहेत त्यांची आणि तुमची पूर्वकाळची घसट आहे. ते फार सधन आहेत असें मी ऐकलें आहे. तर त्यांच्याकडून आपल्या संस्थेसाठीं एखादी भरगच्च देणगी कां मागून घेत नाहीं."

स्वामींनीं बिनधोक पण शांतपणें उत्तर दिलें, "हें पाहा, मी संन्यासी आहें. तीं माझीं कामें नव्हत. मी कुणापुढें हात पसरणार नाहीं. तो पसरावा अशी तुमची अपेक्षा असेल, तर या किल्ल्या घ्या, मला मोकळा करा." बिचारे ट्रस्टी मूग गिळून बसले. स्वामींसारखा प्रामाणिक आणि चोखपणें आणि तोही बिनवेतन व्यवहार करणारा माणूस दुसरा कोण मिळणार ?

आपलें काम आत्मीयतेनें करायचें आणि तें झालें म्हणजे मुकाट्यानें रामनामाचा जप करण्यांत मग्न असायचें. कुणाच्या आध्यांत नाहीं कीं मध्यांत नाहीं, ह्या वृत्तीनें स्वामी आज सतत वीस वर्षें त्या ठिकाणीं आहेत.

पण असे स्वामी गंगाकाठींसुद्धां विरळाच बरं का !

# कर्म करण्यापुरताच अधिकार !

"कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन"
म. गी. २–४७

वरील भगवद्वचनाचा अर्थ, कर्म करण्याचा तुझा अधिकार आहे, फलाची इच्छा तूं करूं नकोस, किंबहुना फलाची इच्छा वा वासना न ठेवतां तू कर्म करीत राहा. असा अर्थ सर्वसामान्यपणें आपणा प्राकृत जनांत रूढ आहे. आणि म्हणून, फलाची इच्छा करायची नाहीं तर तें करें व कां म्हणून करायचें, तें करण्याची प्रेरणा तरी कशी निर्माण होईल, अशी शंका साहजिकच निर्माण होते."

वरील वचनाचा सरळ अर्थ—

"कर्मणि एव अधिकारः ते
फलेषु कदाचन मा (अधिकारः)"

म्हणजे कर्म करण्याचा तुझा अधिकार आहे, फलाचा अधिकार नाहीं असा स्पष्टपणें होतो; हें ध्यानांत ठेवावें. त्यांत अधिकाराचा प्रश्न आहे, इच्छेचा प्रश्नच नाहीं, तो प्रश्न पर्यायानें निर्माण होतो; हें अगदीं उघड आहे.

या वचनाचा अर्थ लोकमान्यांनीं 'कर्म करण्यापुरताच तुझा अधिकार आहे, फल केव्हांही तुझ्या अधिकारांतलें म्हणजे हाव्यांतलें नाहीं,' असाच स्पष्टीला केला आहे (गी. रहस्य पृ. ६११).

आणि उघडच आहे. कर्त्यानें आपला आत्मा ओतून कितीही चोखपणें कर्म केलें, तरी त्याचें फल आजूबाजूंच्या इतर अनेक गोष्टी व परिस्थिती यांवर अवलंबून असणार. त्याची निर्मिती एकट्या त्या कर्त्याच्याच इच्छेनुसार कशी होईल ?

# अन्न तसे विचार....

स्वामी रामकृष्ण परमहंसांच्या दर्शनासाठीं अनेक भक्तजन गोळा होत. नाना प्रकारची मिठाई व फळफळावळ ते बरोबर घेऊन येत. पण स्वामीजी कधीं त्या चाखूनही पाहत नसत. ते म्हणायचे, "हे लोक हवीं तीं खोटींनाटीं कृत्यें करून पैसे मिळवीत असतात. त्यांनीं दिलेले पदार्थ मी खाऊं शकत नाहीं." (The Gospel of Shri Ram Krishna, pp. 93-94 and 515.)

स्वामीजी स्वतः तर त्यांना स्पर्शही करीत नसतच, पण नरेंद्रासारख्या आपल्या अगदीं निकटवर्ती शिष्यांनाही त्या खाऊं देत नसत.

उघडच आहे. जसें अन्न तसेंच रक्त व त्यांतून तशीच बुद्धि व विचार निर्माण होतात. खोट्यानाट्यांतून खोटें नाटेंच निर्माण होतें हा तर आपल्या धर्मांचा ठाम सिद्धांत आहे.

काळ्यांतून पांढरें कसें उद्भवेल !

## त्यांत विनय....

कुणाकडे 'बसायला' गेलें असतां तेथील माणसांनीं बसा म्हणून म्हटल्याशिवाय आपण बसूं नये; आणि कुणी तसें म्हटल्यावर सुद्धां त्या जागीं जी एखादी साधी खुर्ची वा आसन असेल त्यावर बसावें; त्यांनीं आग्रहानें म्हटल्याशिवाय तेथील उंची खुर्ची वा आसनावर आपण होऊन बसूं नये, शिष्टाचाराचा हा एक दंडक आहे. त्यांत विनय दिसतो.

## बलवत्तर इच्छा....

शेवटीं रावसाहेबांस ताप १०८ डिग्री आला होता. त्या योगानें १२ तास बेशुद्ध स्थितींत होते. शेवट केव्हां होईल तें कळण्यासारखें नव्हतें; म्हणून जवळ एक दोन विश्वासाचीं माणसें ठेऊन डॉक्टरमंडळी जरा गच्चीवर उकाडा फार होता म्हणून उपरण्यावर जाऊन बसली. अंत इतका जवळ आला आहे असा संशयही आला नव्हता. मध्येंच ऐकतात तों मोठ्यांनीं उच्चारलेला "राम" शब्द सर्वांच्या कानीं त्रिवार पडला. धावून पाहतात तों प्राणोत्क्रमण झालेलें होतें. जो प्राणी १२ तास मूर्च्छावस्थेंत होता त्याची ती मूर्च्छा जाऊनही प्राणोत्क्रमण वेळा आहे, आतां परमेश्वरनामस्मरण करण्याचा क्षण आला आहे ह्याचें ज्ञान त्यांस होऊन तीन वेळां रामनामाचा घोष करण्याचें त्यांस सुचलें! याचें नांव पूर्वपुण्याई! भगवन्तांनीं म्हटलें आहे—

"अन्तकालेच मामेव स्मरन् मुक्त्वा कलेवरम्।
यःप्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम् ॥

भगवद्गीता—८–५

आपला शेवट असा होण्याची रावसाहेबांची इच्छा पहिल्यापासून होती. १८७१ सालीं आपली कुंडली एका विद्वान ज्योतिर्विदास त्यांनीं दाखवावयास पाठविली. तीबरोबर एक प्रश्नांची यादी होती. त्यांत 'अन्ते नारायणस्मृतिः' असा प्रसंग येईल की नाहीं हा एक प्रश्न होता. या त्यांच्या जन्मभर केलेल्या बलवत् इच्छेप्रमाणें त्यांना परमगति प्राप्त झालीच असली पाहिजे यांत संशय नाहीं."

पान९१८–९१९.

—"रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलीक यांचें चरित्र',

लेखक—न. रा. हवालदार, भाग दुसरा.

अखेर मरतेसमयीं परमेश्वराचें नांव आपल्या मुखीं असावें, त्याची आठवण होऊनच अखेर आपलें प्राणोत्क्रमण व्हावें, अशी बलवत्तर इच्छा खरोखरी अंतःकरणांत बद्धमूल असेल, तर त्याप्रमाणें तें नाम अखेर समयीं मुखांतून बाहेर पडतें म्हणजे त्या वेळीं देवाचीच आठवण होते हें रावसाहेब मंडलिकांच्या वरील आख्यायिकेवरून अगदीं स्पष्ट होतें.

## तोंड फिरवाल तिकडे....

"Allah's are the East and the West. Wherever you turn there is the face of Allah."—Koran 11 : 115.

पूर्व अल्लाची आहे, पश्चिम अल्लाची आहे. तुम्हा तोंड फिरवाल तिकडे अल्ला आहे.

'देव सर्वांठायीं वसे असें आपणही म्हणतोंच. सर्व ब्रह्ममय आहे हेंच अखेर खरें.

## सांगा....

आधुनिक जग प्रश्न विचारतें, "परमेश्वर कुठें आहे?"

राम उत्तर देतात, "परमेश्वर कुठें नाहीं तें सांगा."

(—गो. प्र. मावे, स्वामी रामतीर्थांचें चरित्र)

**पुढील अंक नित्याप्रमाणें जानेवारींत प्रसिद्ध होईल.**

# पळतां भुई थोडी....

एक घार आकाशांत हिंडत असतां तिला खालीं जमिनीवर कांहीं तरी चकाकणारें दिसलें. लगेच तिनें त्यावर झेप घातली. पाहते तों तो एक तांब्याचा पत्रा होता. तिनें तो चोचींत घेतला आणि उड्डाण करून ती झाडावरील आपल्या घरट्यांत आली. तिच्या सखीनें तिला विचारलें, "हें तूं आज काय घेऊन आली आहेस?"

घार म्हणाली, "हा मला मिळालेला ताम्रपट आहे. तो तूं माझ्या गळ्यांत बांध. हवें तेथें जाऊन भक्ष्य आणण्याचा यावच्चंद्रदिवाकरौ हक्क मला असल्याचें त्यावर लिहिलेलें आहे." सखीनें मुकाट्यानें तो पत्रा तिच्या सांगण्याप्रमाणें घारीच्या गळ्यांत बांधला.

घार लगेच तेथून निघाली आणि आकाशांत मनमुरादपणें हिंडू लागली. हिंडतां हिंडतां तिला खालीं जमिनीवर एक मेलेलें जनावर दिसलें. लगेच तिनें त्याच्यावर झेप घेतली. चोचीनें जनावराचा ती लचका तोडून घेणार इतक्यांत चारपांच कावळ्यांनीं येऊन तिच्यावर हल्ला केला. बिचाऱ्या घारीला पळतां भुई थोडी झाली. कसा तरी प्राण मुठींत घेऊन ती तेथून उड्डाण करून आपल्या घरट्यांत आली.

तिला अत्यंत घाबरलेली पाहून तिच्या सखीनें विचारलें, "ताई इतकी घाबरली कां आहेस! आज काय झालं?"

घारीनें घडलेला सारा वृत्तांत सांगितला; तेव्हां सखी म्हणाली, "पण हवं तिथं जाऊन भक्ष्य मिळविण्याचा हक्क असल्याचा ताम्रपट तुझ्या गळ्यांत होताना? तो कां त्या कावळ्यांना तूं दाखविला नाहींस?

घारीनें उत्तर दिलें, "मी बेस दाखवला असता. पण त्यांनीं तो पाहायला हवा ना!

स्वराज्य प्राप्तीनंतर आपणा भारतीय जनतेची स्थिती वरील घारीसारखी झाली आहे. स्वातंत्र्याचा ताम्रपट आपल्याला मिळालेला आहे खरा; पण दंडेलशाहांनी त्याची पर्वा केली पाहिजे ना!

# आपली शब्द संपदा....

पुण्य—पूमांसम् नयति इति पुण्यम्! म्हणजे उत्कर्षाप्रत नेतें, अथवा ज्यामुळे मानवाचा उत्कर्ष होतो, तें पुण्य होय.

निःश्रेयस—नितराम् श्रेयः म्हणजे आत्यंतिक कल्याण तें निःश्रेयस होय.

पुण्य आणि निःश्रेयस यांचे हे खरे अर्थ लक्षात ठेवण्यासारखे आहेत. त्यावरून ते किती चुकीच्या अर्थानें हल्ली आपण रूढ केले आहेत तें ध्यानांत येईल.

खरी आणि शाश्वत अशी शांति मिळविण्यांतच मानव जातीचा खरा उत्कर्ष, तेंच त्याचें खरें निःश्रेयस आहे ही गोष्ट विसरतां कामा नये.

# खोलवर प्रसार....

दूध विकूं नये असा एक दंडक फार प्राचीन काळापासून पूर्वी आपल्यांत होता. उत्तर भारतांत आजही अशी कांहीं गांवें आढळतात कीं तेथील लोक दुधाची विक्री करीत नाहींत (उदाहरणार्थ, सहारणपूर जिल्ह्यांतील दियालहेरी, हें गांव). आज 'पैसा परमेश्वर' हें तत्त्व सर्वत्र जारी असतां अजूनही वरील दंडक कांहीं ठिकाणीं पाळला जात आहे, त्यावरून आपली संस्कृति किती खोलवर रुजलेली आहे त्याची साक्ष पटते.

# हाच प्रार्थनेचा उद्देश....

सकाळीं उठल्यावर दांतण करण्याचे समयीं, ज्या झाडाच्या काडीनें आपण दांत घांसतों त्या वृक्षाला अनुलक्षून पुढील प्रार्थना करण्याची पूर्वी प्रथा होती :

" मेधां ब्रह्मधियं चैव त्वं मे देहि वनस्पते "
गणेश पुराण, अ. ३-२१. २२.

"हे वनस्पते, मला धारणा शक्ति दे, ब्रह्मबुद्धि दे."

ब्रह्मबुद्धि म्हणजे सर्वत्र परब्रह्म अतएव ठायीं ठायीं, वस्तूवस्तूंत ब्रह्म अतएव परमेश्वर व्यापलेला आहे, अशी भावना होय.

सकाळीं आपले दैनंदिन उद्योग सुरू करण्यापूर्वीच, आपण सर्व एक आहोंत, ही व्यापकतेची भावना मनांत दृढमूल करणें, हाच या प्रार्थनेचा उद्देश होता हें उघड आहे.

१. संपूर्ण प्रार्थन अत्यंत उद्बोधक आहे. ती अशी—

—"तत आचम्य काष्ठं तु क्षीरकण्टक वृक्षयोः ॥ २० ॥ गृहीत्वा प्रार्थनापूर्व दन्तान् जिव्हां विशोधयेत् । बलमोजो यशस्तेजःपशु-बुद्धिधनानिच ॥ २१ ॥ मेधां ब्रह्मधियं चैव त्वं मे देहि वनस्पते ॥ २२ ॥

# विनोदही सुचत असे....

आपले संतकवि केवळ भक्तिरसांतच सदा डुबलेले असत अशी आपली समजूत असेल तर पुढील ओळी पाहा. त्यांना बाळबोध विनोदही मधुन मधुन सुचत असे, असें आपल्याला दिसून येईल,

लुगड्या नांव चंद्रकळा।
परी तो काळा रंग वरी ॥ १ ॥
घोळण्या नांव लक्ष्मण।
करितें भंजन लाह्यांचें ॥ २ ॥
निळा म्हणे घुसळिती रवी।
परी ते दावी न प्रकाश ॥ ४ ॥

निळोबा (जन्म इ. स. १६३५),
स. सं. गाथा, भा. २, पृ. १५३.

खरें म्हणजे चांदणें पांढरें शुभ्र असतें, पण काळ्या कुळकुळीत लुगड्याला म्हणतात चंद्रकळा. लक्ष्मणानें रामाची साथ केली. पण लाह्या भाजण्याच्या घोळण्याला लक्ष्मण असें नांव आहे आणि ताक करायची रवी पाहा. सूर्याप्रमाणें तिचा कुठें प्रकाश पडतो का? केवळ नांवाचीच ती रवी.

# तीर्थस्वरूप नव्हे तीर्थसरूप!

आईवडिलांना पत्र लिहितांना किंवा अन्यत्र त्यांचा उल्लेख करतांना 'तीर्थरूप' आणि त्यांपेक्षां इतरवडील मंडळींचा 'तीर्थ-स्वरूप' असा उल्लेख करण्याचा प्रघात आहे. त्यांत आईवडील व इतर ज्येष्ठमंडळी यांच्यांत पूज्यतेच्या बाबतींत असलेला सूक्ष्म-भेद दर्शविणें हा हेतु आहे. पण रूप आणि स्वरूप शब्द एकार्थकच असल्यामुळें तो अभिप्रेत अर्थ व्यक्त होत नाहीं. म्हणून इतर वडीलमंडळींचा उल्लेख करतांना 'तीर्थसरूप' हा शब्द वापरणें उचित ठरेल. तीर्थ हेंच ज्यांचें रूप आहे ते आईवडील तीर्थरूप. आणि तीर्थासमान ज्यांचें रूप आहे असे इतर ज्येष्ठ आप्त ते 'तीर्थसरूप.'

कमलरूपी चरण आणि कमलाप्रमाणें चरण यांत जो सूक्ष्मभेद अनुक्रमें रूपक आणि उपमालंकारानें दर्शविला जातो त्याप्रमाणें तीर्थरूप आणि तीर्थसरूप या शब्दांनीं दर्शविला जातो. म्हणून तीर्थरूपी माता-पित्यांचा उल्लेख तीर्थरूप शब्दानें आणि तीर्थाप्रमाणें पवित्र अशा इतरांचा उल्लेख 'तीर्थसरूप' शब्दानें करणें उचित ठरेल.

## क्षमस्व....

ऋचा आम्ही संधी तोडून छापीत असतों म्हणून कांहीं सज्जन आमच्यावर रुष्ट आहेत. पण ज्ञानाचा प्रसार शक्य तितका खोलवर व्हावा हाच 'सद्धर्मा'चा एकमेव जीवनहेतु असल्यानें तें सुलभ होण्यासाठीं आम्हीं तसें करीत असतों. नाइलाज आहे.

आणि त्यांत नवीन असें आम्ही कांहींच करीत नाहीं. कारण.

> संहितैकपदे नित्या
> नित्या धातूपसर्गयोः ।
> नित्या समासे वाक्ये तु
> सा विवक्षामपेक्षते ॥"
>
> —कौमुदी

संहिता म्हणजे जोडणें—जोडून लिहिणें—संधि करणें: धातु आणि उपसर्ग आणि समास यांमध्यें संहिता म्हणजे जोडून लिहिणें आवश्यक असलें तरी वाक्यांत तें वक्त्याच्या इच्छेवरच अवलंबून असावें, असा प्रत्यक्ष कौमुदीकारांनींच दंडक घालून दिलेला आहे.

शिवाय गणेशसहस्रनामाचे विद्वान टीकाकार भास्करराय यांनीं संधि तोडूनच लिहिलें पाहिजे असें जे अत्यंत आग्रहपूर्वक प्रतिपादन केलें आहे, तें सुप्रसिद्धच आहे.

मात्र असें करण्यानें उपरीनिर्दिष्ट सज्जनांच्या भावना दुखवल्या जात असल्या तर त्याबद्दल त्यांनीं आम्हास क्षमा करावी.

ॐ शांतिः शांतिः शांतिः ।

## देण्यांतच आनंद....

रमण महर्षींना एका पाश्चात्य विदुषीनें म्हटलें, "स्वामीजी, आपण गाईचें दूध घेतां, पण अंडीं मात्र खात नाहीं, याचें काय कारण?"

महर्षी म्हणाले, "पाळलेल्या गाईंना वासरांच्या गरजेहून अधिक दूध येत असतें. आणि तें इतरांना देण्यांतच त्यांना आनंद असतो.

विदुषी, "पण कोंबड्याही अंडीं ओटींतून बाहेर टाकीत असतात. त्यांनाही तीं नको असतात."

महर्षी, "होय, पण त्या अंड्यांतून कोंबड्या निर्माण होतात. दुधाचें तसें नाहीं."

उघडच आहे. दुधांतून कांहीं गाई बाहेर पडत नाहींत.

## कृपया....

पुढील वर्षासाठीं वर्गणी रुपये दोन स्मरणपूर्वक धाडावी.

एकदम दोन वा तीन वर्षांची धाडल्यास उभयपक्षीं सोईचें होईल नाहीं का?

तद्विषयीं कांहीं विचारणा करणें असल्यास जोड कार्ड धाडावें.

आपला देणगीदार क्रमांक ती धाडतांना लिहावा. अंकाच्या पाकिटावरील पत्त्यांत आपल्या नांवामागें तो असतो.

मनी ऑर्डर धाडल्यास तिच्या कूपनवर आपलें पूर्ण कुलनाम व पत्ता लिहिण्यास विसरूं नये, ही विनंती. क्षमस्व.

मुद्रक व प्रकाशक : भालचंद्र जरासनी. सद्धर्म प्रकाशन, १ ओवेनडन रोड, मुंबई ७
मुद्रणस्थळ : मौज प्रिंटिंग ब्यूरो, गिरगाव, मुंबई ४